SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
PHONE : Director Office –( 0231)2609068 CAP Section – (0231)2609317/2609110 Website – www.unishivaji.ac.in, Email – cap@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६००४, महाराष्ट्र
दुरध्वनी : संचालक कार्यालय-०२३१ २६०९०६८ मध्यवर्ती मूल्यमापन विभाग-०२३१ २६०९३१७/२६०९११० संकेतस्थळ – www.unishivaji.ac.in, ई-मेल आयडी - cap@unishivaji.ac.in
Estd. 1962
"A++"
Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

Ref. No. SU/Exam/CAP/ 528 Date: 22 NOV 2024

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त शिक्षण संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय : ऑक्टो./नोव्हें.,२०२४ या हिवाळी सत्र परीक्षेसाठी पारंपारिक तसेच इतर काही अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमांच्या मूल्यमापनाबाबत.**

**संदर्भ : सं.क्र.एसयु/एक्झाम/कॅप/४३०, दि.१३/०९/२०२४ रोजीचे पत्र.**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये, ज्या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष तसेच प्रथम व द्वितीय वर्षाच्या परीक्षा महाविद्यालयीन स्तरावर घेण्यात येत होत्या, अशा अभ्यासक्रमांच्या परीक्षा हया तृतीय वर्षाप्रमाणे (वेळापत्रक, प्रश्नपत्रिका आयोजन, परीक्षा आयोजन व मूल्यमापन) शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून विद्यापीठ स्तरावर होणार असलेबाबत आपणास कळविण्यात आले होते.

तथापि, परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केलेल्या शिफारशीस अनुसरून विद्यापरिषदेने पारंपारिक तसेच इतर काही पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या परीक्षांचे उत्तरपत्रिका मूल्यमापन कामकाज **फक्त ऑक्टो./नोव्हें.,२०२४ या हिवाळी सत्राकरीता** महाविद्यालयीन स्तरावर करण्यास मान्यता दिली आहे. तसेच या अनुषंगाने आर्थिक बाबींबाबत धोरण ठरविण्यासाठी विषय व्यवस्थापन परिषदेसमोर विचारार्थ ठेवण्यात आला आहे.

तेंव्हा त्याअनुषंगाने आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, पारंपारिक तसेच इतर काही पदवी अभ्यासक्रमांच्या **फक्त ऑक्टो./नोव्हें.,२०२४ या हिवाळी सत्राच्या** प्रथम वर्ष परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन महाविद्यालय स्तरावर करण्यात येईल. तसेच **या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाही बाबतची कार्यपध्दती व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेनंतर आपणांस स्वतंत्रपणे कळविण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.**

आपला विश्वासू,

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत – माहितीसाठी व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी.

1. मा. कुलगुरु कार्यालय
2. मा. प्र-कुलगुरु कार्यालय
3. मा. कुलसचिव कार्यालय
4. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ कार्यालय
5. मा. वित्त व लेखा अधिकारी कार्यालय
6. परीक्षा विभागातील सर्व संबंधीत विभाग व सर्व अधिकारी
7. आय.टी.कक्ष
8. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
9. विद्यार्थी सुविधा केंद्र
10. इंटरनेट विभागास सदरचे पत्र विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी